॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सन २०२६-२७ च्या २९३.५७ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला शनिवार दिनांक १४ मार्च रोजी अधिसभेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या अर्थसंकल्पात १५.४४ कोटी रूपयांची तूट दर्शविण्यात आली आहे.

कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली अधिसभेची बैठक झाली. व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे यांनी हा अर्थसंकल्प सादर केला. त्यांनी सविस्तर अर्थसंकल्पीय अभिभाषण करतांना विद्यापीठाच्या विकासाचा आढावा घेत मागील अर्थसंकल्पातील तरतूदींचा मागोवा देखील घेतला. सन २०२५-२६ वा अर्थसंकल्प ३१७.९६ कोटींचा होता. गतवर्षी १७.८७ कोटींची तूट दर्शविण्यात आली होती. विभागवार आढाव्यानंतर सुधारित म्हणून १७.१३ कोटीची तूट सादर करण्यात आला. अर्थसंकल्पाचा फुगवटा कमी करणे हा दृष्टीकोन समोर ठेऊन यावर्षीच्या अर्थसंकल्पात बऱ्याच सुधारणा करण्यात आल्या.

यंदाचा अर्थसंकल्प २९३.५७ कोटी रु. एवढा असून तूट १५.४४ कोटी रु. एवढी आहे. यंदा गतवर्षीच्या तुलनेत तूट १.६९ कोटींनी कमी झाली आहे. या अर्थसंकल्पात परिरक्षणासाठी २१३.९२ कोटी, योजनांतर्गत विकासासाठी ४५.०५ कोटी आणि विशेष कार्यक्रम/योजनांसाठी ३४.६० कोटी तरतूद आहे. २९३.५७ कोटींचा या अर्थ संकल्पात महसूली खर्च म्हणून १८५.९३ कोटी, भांडवली तरतूद २७.९९ कोटी असून योजनांतर्गतचा विकासात्मक बाबींवरील खर्च ४५.५ कोटी असून इतर विशेष कार्यक्रम व योजनांतर्गत मिळणाऱ्या अनुदानांतर्गतचा खर्च म्हणून ३४.६० कोटी दर्शविण्यात आला आहे.

या आर्थिक वर्षात नवीन पाच महत्वाकांक्षी योजनांना प्रारंभ करण्यात येणार आहे त्यामध्ये

१) डिजिटायझेशन ऑफ स्टूडंट लेझर्स अँड ब्लॉकचेन डिग्री सर्टिफिकेट योजनेसाठी २०० लक्ष एवढी रक्कम राखीव करण्यात आली आहे.

२)आजच्या जागतिक स्पर्धेत कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ तंत्रज्ञान नसून प्रगतीचे मुख्य साधन बनले आहे. खानदेशातील विद्यार्थ्यांना या जागतिक बदलांशी जुळवून घेता यावे यासाठी कुलगुरूंनी कृत्रिम बुद्धिमत्ता, साक्षरता आणि विकास अभियान (विद्यार्थी) ही योजना प्रस्तावित केली असून याकरिता १००. लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

३) आजच्या डिजिटल युगात शिक्षकांसाठी एआय हे केवळ शिकवण्याचे साधन नसून, ते वैयक्तिकृत शिक्षण, संशोधन आणि मूल्यमापन प्रक्रिया अधिक अचूक करण्यासाठी उपयुक्त आहे. दुसरीकडे, शिक्षकेतर कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी प्रशासकीय कामांमधील क्लिष्टता कमी करणे, फाईल्सचे व्यवस्थापन आणि डेटा विश्लेषण यामध्ये एआय क्रांती घडवू शकते. विद्यापीठाच्या कामकाजात पारदर्शकता, वेग आणि आधुनिकता आणण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक कौशल्यांचे अद्ययावतीकरण करणे आवश्यक आहे. शिक्षकांना 'स्मार्ट टीचिंग' आणि कर्मचाऱ्यांना 'स्मार्ट ॲडमिनिस्ट्रेशन'साठी तयार करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, साक्षरता आणि विकास अभियान (शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी) योजना सुरू करण्यात येणार असून त्यासाठी रू. २० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

४) विज्ञानाचे शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानावर आधारित नसून प्रयोगांवर अवलंबून असते. मात्र, सध्या अनेक महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक किंवा कायमस्वरूपी तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे विज्ञानाचे प्रयोग करून दाखवण्यात अडचणी येत आहेत. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानावर आणि त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनावर होत आहे. याकरिता कुलगुरू विज्ञान प्रात्यक्षिक योजना सुरू करण्यात येणार असून त्याकरिता ५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

५) बदलत्या जीवनशैलीत आणि मोबाईलच्या अतिवापरात विद्यार्थ्यांचे मैदानी खेळांकडे दुर्लक्ष होत आहे. अशा परिस्थितीत. प्रशाळा-प्रशाळांमधील संवाद वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमधील सुप्त क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी या आंतरप्रशाळा क्रीडा उत्सव योजना सुरू करण्यात येणार असून त्याकरिता २ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या पाच योजनांचा समावेश आहे.

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून या अर्थसंकल्पात विद्यार्थी विकास विभागांतर्गत आपत्ती व्यवस्थान कक्ष व प्रशिक्षण कार्यशाळा, चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्र, ग्राम दत्तक योजना या योजना पुन्हा क्रीयान्वयीत करून त्यांच्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी विकास विभागाच्या आर्थिक तरतुदीत १७१ लक्ष रुपयांची भरघोस वाढ करून ही तरतूद ७६० लक्ष वरून ९३१ लक्ष रुपये करण्यात आली आहे. क्रीडा विभागासाठीच्या आर्थिक तरतुदीत १७ लक्षांची वाढ करून ती २२० लक्ष वरून २३७ लक्ष केली आहे. संशोधन आणि विकास विभागीसाठीच्या आर्थिक तरतुदीत ४० लक्ष वाढ करून ती मागील

वर्षीच्या ३६४ लक्षांवरून ४०४ लक्ष इतकी करण्यात आली आहे. संशोधन महोत्सव अविष्कारची आर्थिक मर्यादा १५ लक्ष वरून २० लक्ष करण्यात आली आहे. अखिल भारतीय/राज्यस्तरीय युवक महोत्सवासाठी विद्यार्थी पाठविण्यासंदर्भातील तरतूद ७ लक्षांवरून २० लक्ष करण्यात आली आहे. युवारंग युवक महोत्सवाच्या आर्थिक तरतुदीत ५० लक्षांवरून ५५ लक्ष इतकी वाढ करण्यात आली आहे.

अर्थसंकल्प मांडतांना नितीन झाल्टे यांनी कवयित्री बहिणाबाई यांच्या कवितेच्या ओळी सादर केल्या. त्यांनी गतवर्षातील योजनांचा आढावा देखील सादर केला. अर्थसंकल्पाच्या चर्चेच्या वेळी अधिसभा सदस्य दीपक पाटील, आ. डॉ. मनीषा कायंदे, अमोल मराठे, नितीन ठाकूर, दिनेश चव्हाण, अमोल सोनवणे, ऋषीकेश चित्तम, डॉ. धीरज वैष्णव यांनी कपात सूचना केल्या. या कपात सूचनेवर वित्त व अधिकारी सीए रवींद्र पाटील यांनी माहिती दिली त्यावर चर्चा होवून सदस्यांनी या कपात सूचना मागे घेतल्या. बैठकीत अर्थसंकल्पावर चर्चा होऊन त्याला मान्यता देण्यात आली. आजच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली.

आजच्या बैठकीत प्रश्नोत्तराच्या तासात विष्णू भंगाळे, प्रा. जयवंत मगर, डॉ. ऋषीकेश चित्तम,आ. डॉ. मनीषा कायंदे यांच्या प्रश्नांना प्रा. योगेश पाटील, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी उत्तरे दिलीत. या बैठकीत प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यावेळी उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीस दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार व माजी कुलसचिव डॉ. एम. व्ही. बरीदे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. तसेच नवीन सदस्य आमदार डॉ. मनिषा कायंदे व डॉ. चंद्रशेखर वाणी यांचे स्वागत करण्यात आले.

कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी बैठकीचे सुत्रसंचालन केले. या बैठकीला प्राचार्य एस.एस. राजपूत, प्रा. जगदीश पाटील, प्रा. अनिल डोंगरे, डॉ. राजेश जवळेकर, डॉ. दिनेश पाटील, प्रा. आशुतोष पाटील, प्राचार्य संजय सुराणा, प्राचार्य सखाराम पाटील, प्राचार्य आय.डी. पाटील, प्राचार्य महेंद्र रघुवंशी, डॉ. पवित्रा पाटील, प्राचार्य वैशाली पाटील, भरत गावीत, विलास जोशी, प्रा. संदीप नेरकर, प्रा.एस.टी. भुकन, केदारनाथ कवडीवाले, प्रा. गजानन पाटील, डॉ. मंदा गावीत, प्रा.सुरेखा पालवे, प्रा. वर्षा पाटील, डॉ. पद्माकर पाटील, प्रा. विशाल पराते, प्रा. किर्ती कमळजा, दिनेश खरात, स्वप्नाली महाजन, भानुदास येवलेकर, जयंत उत्तरवार, नरेंद्र नारखेडे, ॲड. केतन डाके, नेहा जोशी, वैशाली वराडे उपस्थित होते. सर्व सदस्यांनी विविध विषयांवर तसेच अर्थ संकल्पावरील चर्चेत भाग घेऊन काही उपयुक्त सूचना केल्या. सभा सायंकाळी उशिरा पर्यंत सुरु होती.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १४ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता